“कांदा बाजारभावातील घसरण व कांद्याबाबत सर्वंकष तातडीच्या व दीर्घकालीन उपाययोजना” यासाठी सचिव स्तरीय समिती गठित करणेबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-बैठक-२०२६/प्र.क्र.७०/२४-स**
मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- २३ एप्रिल, २०२६

**संदर्भ:-** मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित दिनांक २५.०३.२०२६ रोजीच्या बैठकीतील निर्णय

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्राचा विचार करता, कांदा पिकविणा-या राज्यांपैकी क्षेत्र व उत्पादनाच्या बाबतीत महाराष्ट्र अग्रेसर आहे. राज्यात नाशिक, पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, जळगाव आणि धुळे हे जिल्हे कांदा उत्पादनात आघाडीवर आहेत. देशातील एकूण कांदा उत्पादनाच्या ४० ते ५० टक्के उत्पादन महाराष्ट्रात घेण्यात येते.

महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादनात अग्रेसर असूनही कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. त्यामध्ये कांद्याच्या दरातील घसरण, साठवणूकीबाबतच्या समस्या, पायाभूत सुविधांचा अभाव, केंद्रशासनाचे कांदा निर्यात धोरण याबाबींचा समावेश होतो. त्यानुषंगाने सविस्तर चर्चा करण्यासाठी विधानभवन मुंबई येथे मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५.०३.२०२६ रोजी विधानभवन, मुंबई येथे कांदा आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत चर्चेअंती घेण्यात आलेल्या निर्णयानुसार राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी तातडीच्या व दिर्घकालीन उपाययोजना सूचविण्यासाठी सचिव स्तरावर समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

“कांदा बाजारभावातील घसरण व कांद्याबाबत सर्वंकष तातडीच्या व दीर्घकालीन उपाययोजना”यांचा अभ्यास करून शासनास शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे सचिव स्तरीय समिती गठित करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | अधिकारी | पद |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २ | प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |

| अ.क्र. | अधिकारी | पद |
|---|---|---|
| ३ | सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४ | आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ५ | कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे | सदस्य सचिव |

**०२. समितीची कार्यकक्षा :-**

I. कांदा दर घसरणीच्या परिस्थितीची कारणमीमांसा
II. कांदा दर घसरणीसंदर्भात करावयाची तातडीची उपाययोजना
III. कांदा निर्यातीसाठी विविध उपाययोजना
IV. कांदा पिकाबाबत करावयाच्या दिर्घकालीन उपाययोजना
V. प्रामुख्याने दिर्घकालीन उपाययोजना अहवालामध्ये "Crop Diversification" संदर्भात राबवावयाची योजना

**०३. समितीचा कार्यकाल :-**

सदर समितीचा अहवाल अंतीम मान्यतेपर्यंत.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४२३१६३४४१९८०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ANIROODHA SURYAKANT DESHPANDE
Date: 2026.04.23 16:37:03 +05'30'

**(अनिरुध्द सू. देशपांडे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा.मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव
३) अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव ( सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
५) सचिव(कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
६) आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) सह सचिव(पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
८) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
१०) निवडनस्ती (२४-स)